। ब्राह्मण कुटुंबातील प्रत्येक व्यक्तिच्या उन्नतीसाठी एक प्रभावी माध्यम ।

ब्राह्मण व्यावसायिक पत्रिका

BRAHMAN BUSINESS JOURNAL

■ पुणे ■ डिसेंबर २०१८ ■ वर्ष १४ – अंक १२ ■ किंमत रु. ७०/– ■ पृष्ठसंख्या ४४ ■ संस्थापक संपादक : गोविंद हर्डीकर

Interact

# वैदिक गणिताचे जनक : स्वामी भारती कृष्णतीर्थ महाराज

## (१८८४ – १९६०)

वैदिक गणित म्हणजे वेदाध्ययनातून स्फुरलेले, अंतर्मनातून बाहेर आलेले एक अद्वितीय गणित आहे. मागील लेखात आपण वैदिक गणिताच्या विविध प्रश्नांवर चर्चा केली. या लेखात आपण चर्चा करणार आहोत वैदिक गणिताचे जनक जगद्गुरू शंकराचार्य श्री भारती कृष्णतीर्थ यांच्याविषयी. खरं तर त्यांच्यविषयी ज्यानं काही ऐकलेलं नाही, असा बुद्धिवंत विरळाच. चला तर जाणून घेऊ या गणितातील एका महान व्यक्तिमत्त्वाविषयी :



**प्रश्न – श्री. भारती कृष्णतीर्थ यांचं बालपण कसं होतं?**

– श्री. गुरुजींचं मूळ नाव होतं वेंकटरमण. एक अष्टपैलू विद्यार्थी म्हणून शाळेत त्यांचं नाव घेतलं जायचं. लहान वयातच गणितातील घडामोडी ते लीलया करत आणि इतर वर्गमित्रांना अवाक् करत. प्रत्येक विषयात अव्वल मार्क्स ते मिळवत. लहान वयात संस्कृतवर चांगलंच प्रभुत्व होतं व वक्तृत्वही उत्तम होतं.

**प्रश्न – गुरुजींचं शिक्षण कुठे झालं?**

– तिरुचिरापल्ली येथील 'नॅशनल कॉलेज', तिरुनेलवेली येथील 'चर्च मिशनरी सोसायटी कॉलेज' आणि तेथीलच 'हिंदू कॉलेज' इथं त्यांचं शालेय शिक्षण झालं. १८९९ मध्ये मद्रास विद्यापीठाने घेतलेल्या मॅट्रिकच्या परीक्षेत ते प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाले.

प्रश्न – त्यांचं व्यक्तिमत्त्व कसं होतं? त्यांचा संस्कृत विषयातील अभ्यास कसा होता? व त्यांचे संस्कृतमधील गुरू कोण?

– संस्कृतवर उत्तम प्रभुत्व असल्यामुळे त्यांचं वक्तृत्वही प्रभावी होतं. श्री. वेदम् वेंकटराव शास्त्री हे त्यांचे संस्कृतचे गुरू. या गुरूंच्या व्यक्तिमत्त्वाचा इतका खोल ठसा गुरुजींच्या मनावर उमटला होता, की जेव्हा जेव्हा त्यांची आठवण निघे तेव्हा त्यांच्या विषयीचे अष्टसात्त्विक भाव जागृत होत व डोळ्यांतून अश्रू येत. संस्कृतमधील त्यांच्या अभ्यासामुळे वयाच्या १५ व्या वर्षीच जुलै १८९९ मध्ये – मद्रास संस्कृत संघटनेनं त्यांना 'सरस्वती' ही पदवी दिली.

**प्रश्न – गुरुजींनी कोणते जागतिक विक्रम केले आहेत?**

– मट्रिक परीक्षा प्रथम क्रमांकात उत्तीर्ण झाल्यावर पुढे बीएच्या परीक्षेतही त्यांनी पहिला क्रमांक मिळवला. एमएसाठी न्यूयॉर्क इथल्या अमेरिकन कॉलेज ऑफ सायन्सतर्फे घेतल्या गेलेल्या परीक्षेत वयाच्या विसाव्या वर्षीच त्यांनी तत्त्वज्ञान, इंग्रजी, संस्कृत, गणित, इतिहास आणि विज्ञान या सहाही विषयांत सर्वोच्च गुण मिळवून एक जागतिक विक्रमच नोंदवला.



**विजय कुलकर्णी**
**९६०४५५५१९३**

– ब्रह्मर्षी इन्स्टिट्यूट, सिंहगड रोड, पुणे.
www.brahmarshiinstitute.in
vijaykulkarni15@yahoo.in

***

॥ श्री ॥
कोकण मेवा
**कोकणातील १२० खाद्य पदार्थ मिळण्याचे एकमेव ठिकाण !**
१५ प्रकारची सरबते येथे होलसेल रेट मध्ये मिळतील.
होलसेल करीता संपर्क
प्रो. विलास का. ओक ९८२२३ २१९१५, ०२०–२४४३१७६३,
१३१५/४, सदाशिव पेठ, भरतनाट्यमंदिर कॉर्नर, पावन मारुती जवळ, पुणे ४११०३०
Email : kokanmewa.oak@gmail.com Website : www.kokanmewa.com



**OEM Ekvira Media Pvt. Ltd.**
Office No. 15 & 16, Vishnu Priya Apartment, 5th Floor, Above Nirmitee Show-room, Ganesh Mala, Sinhagad Road, Pune 411030
Contact No. 81490 90765 / 72767 00766, Email : patrika.bvp@gmail.com